# ’साहित्यिक, पत्रकार, कलावंतांनी जागृत होणे गरजेचे’

सकाळ वृत्तसेवा Saturday, January 29, 2011

पुणे - ""आजच्या समाजात संस्कृतीचा ऱ्हास झाला आहे; पण साहित्यिक व कलावंत थिजून गेल्याप्रमाणे शांत बसले आहेत, संवेदनाहीन झाले आहेत. लेखक, साहित्यिक, पत्रकार, कलावंत, प्राध्यापक हे घटक जागृत होतील तरच सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने पुढे पावले पडतील,'' असे मत ज्येष्ठ पत्रकार अरुण टिकेकर यांनी व्यक्त केले.

अमेरिकेत स्थायिक झालेल्या मराठी माणसांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र फाउंडेशनच्या साहित्य व समाजकार्य पुरस्काराचे वितरण अभिनेते-दिग्दर्शक अमोल पालेकर, शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते बालगंधर्व रंगमंदिरात झाले, त्या वेळी ते बोलत होते.

टिकेकर यांना "साहित्य जीवन गौरव पुरस्कार' तर ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी नागनाथअण्णा नायकवडी यांना "समाजकार्य जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. प्रशस्तिपत्र, दोन लाख रुपये असे त्याचे स्वरूप आहे. ग्रंथ पुरस्कारामध्ये आनंद तेलतुंबडे (वैचारिक लेखन), जी. के. ऐनापुरे (ललित ग्रंथ), वि. ना. श्रीखंडे (अपारंपरिक ग्रंथ), सय्यदभाई (विशेष ग्रंथ पुरस्कार), आशुतोष पोतदार (नाट्य पुरस्कार) यांना प्रदान करण्यात आले. प्रशस्तिपत्र व २५ हजार रुपये, असे पुरस्काराचे स्वरूप आहे. समाजप्रबोधन पुरस्कार अकोला जिल्ह्यातील सत्यपाल महाराज, संतुलन संस्थेचे संस्थापक बस्तू रेगे, स्त्री-पुरुष समानतेसाठी काम हरीश सदाणी यांना प्रदान करण्यात आला. प्रशस्तिपत्र व ५० हजार रुपये, असे त्याचे स्वरूप आहे. आदिवासींसाठी काम करणाऱ्या नीलेश निमकर यांना युवा कार्यकर्ता पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रशस्तिपत्र व २५ हजार रुपये, असे त्याचे स्वरूप आहे. पर्यायी आर्थिक विकासाची मांडणी करणारे चंद्रकांत केळकर यांना विशेष कार्य पुरस्कार, तर लक्षवेधी प्रशासकीय कार्य पुरस्कार कोल्हापूरचे जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांना प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी मोहन धारिया होते. भारतातील पुरस्कार निवड समितीचे निमंत्रक व साधना साप्ताहिकाचे विश्वस्त सचिव नरेंद्र दाभोलकर, पुरस्काराचे प्रवर्तक सुनील देशमुख या वेळी उपस्थित होते.

टिकेकर म्हणाले, ""आजच्या समाजाला उपदेशाचे डोस पाजण्यापेक्षा विचार करायला प्रवृत्त केले पाहिजे. विचार बदलल्याशिवाय समाज बदलत नाही. इंग्रजी व मराठी या दोन भाषांच्या संदर्भातील वाद बेगडी आहेत. मराठीवर प्रभुत्व मिळवायचे असेल तर इंग्रजी भाषाही शिकण्याची गरज आहे. लेखन करताना सभ्यता न सोडता सौम्यपणे पण नेमके शब्द वापरून कठोर टीका करता येते. असभ्य शब्दप्रयोग करून जहरी टीका करून इतरांचे वस्त्रहरण करता येते. त्यातून वाचकांचे मनोरंजनही होते. पण, सनसनाटी व भडक टीकेचा वाचकावर परिणाम होत नाही, हा माझा गेल्या २५ वर्षांचा अनुभव आहे.''

तळागाळातील शोषित घटकांसाठी काम करण्याची गरज पूर्वीपेक्षा मला सध्या जास्त वाटत आहे. त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी या वयातही असंख्य कार्यकर्त्यांसह शिकस्तीचे प्रयत्न चालू ठेवणार आहे, असे नायकवडी यांनी

सांगितले. पालेकर म्हणाले, ""समाजात छोटी पणती घेऊन काम करणाऱ्या लोकांना बघतो, तेव्हा अगदीच निराश होण्यासारखी परिस्थिती नाही, असा विश्वास वाटतो.'' पुरस्कार विजेत्यांची ओळख व मनोगत असलेला "साधना'चा विशेषांक प्रकाशित झाला. "साधना'चे कार्यकारी संपादक विनोद शिरसाट यांनी सूत्रसंचालन केले.

"इंडिया'चा विकासदर भारताचा व्हावा!'

माशेलकर म्हणाले, ""तरुणाईला सक्षम करण्यासाठी आणि ग्रामीण भागातील उपेक्षित घटकातील समाजाला विकासाची फळे चाखता यावीत, यासाठी धोरणे आखली पाहिजेत. भारताच्या आर्थिक विकास दराबद्दल बोलतो, तेव्हा वाढत असलेला विकासदर "इंडिया'चा असतो. तो भारताचा होईल यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.''